**रे.मु.नं. ३११/२०१७**
**मारुती जगताप उर्फ राजेंद्र जगताप**

## आदेश निशाणी २० वर

**१.** सदर अर्ज प्रतिवादी क्रमांक १ यांनी तुर्तातूर्त मनाईसाठी दाखल केलेला आहे. अर्जामध्ये प्रतिवादींनी अशी विनंती केलेली आहे की, दावा कलम १अ यामध्ये वर्णन केलेल्या मिळकतींना वादी यांच्या ७/१२ उताऱ्यावर असलेल्या नोंदीचा गैरफायदा घेऊन, वादी यांनी सदर मिळकतींची विक्री, हस्तांतरण वा तबदीली करू नये, असा तुर्तातूर्त मनाईचा आदेश वादी यांचेविरूध्द पारीत करण्यात यावा.

**२.** अर्जामध्ये प्रतिवादी क्रमांक १ यांनी असे नमूद केले आहे की, वाद मिळकती या वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र कुटूंबाच्या मिळकती आहेत. त्या मिळकतींमध्ये प्रतिवादी क्रमांक १ यांचा अविभक्त हिस्सा आहे. असे असताना दिनांक ११/०६/२०१७ रोजी वादी वाद मिळकतीमध्ये आले व तिऱ्हाईत इसमांना वाद मिळकतीची वस्तुस्थिती सांगू लागले. त्यावर प्रतिवादी क्रमांक १ यांनी वादींना जाब विचारला असता, वादी यांनी प्रतिवादी क्रमांक १ यांना असे सांगितले की, ''मी जमीन विकणार आहे, तुला काय करावयाचे आहे, ते कर.'' त्यावरून असे दिसून येते की, वादींना वाद मिळकत विकावयाची आहे. तथापि, अद्यापी वाद मिळकतीचे वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान सरस—निरस मानाने वाटप झालेले नाही. तरीदेखील वादी वाद मिळकत विकण्याच्या प्रयत्नांत आहेत. वादींनी तसे केल्यास, प्रतिवादी यांचे अपरिमित नुकसान होईल. सदर दाव्याचा गुणदोषावर अंतिम न्यायनिर्णय लागण्यास बराच कालावधी जाणार आहे. या दाव्यामध्ये यश येण्याची प्रतिवादी यांना खात्री आहे. न्यायाचा तराजूही प्रतिवादी यांचे लाभात आहे.

अशा परिस्थितीत वादींविरूध्द तुर्तातूर्त मनाई आदेश पारीत करण्याची आवश्यकता आहे.

**३.** सदर अर्जास वादी यांनी लेखी म्हणणे दिलेले आहे. त्यामध्ये वादींनी असे नमूद केले आहे की, वाद मिळकती वादी यांच्या स्वकष्टार्जित मालकीच्या व वहिवाटीच्या आहेत. प्रतिवादी क्रमांक १ यांचा वाद मिळकतीशी काहीही संबंध नाही. अशा परिस्थितीमध्ये वाद मिळकत हस्तांतरीत करण्याचा वादींना पूर्ण हक्क व अधिकार आहे. तो हक्क व अधिकार प्रतिवादींना रोखता येणार नाही. त्याचप्रमाणे लेखी म्हणण्यामध्ये पुढे असेही नमूद केले आहे की, वाद मिळकती एकत्र हिंदू कुटूंबाच्या मालकीच्या आहेत, असे पुराव्यानिशी सिध्द केल्यास, प्रतिवादी क्रमांक १ यांना कायदेशीर वाटप मागण्याचा मार्ग असून, तसे न करता प्रतिवादी क्रमांक १ व २ हे कायदा हातामध्ये घेऊन वृध्द वादींना मानसिक त्रास देण्याचे कृत्य करीत आहेत. न्यायाचा तराजू वादी यांचे बाजूने आहे. या सर्व परिस्थितीचा विचार करता प्रतिवादींचा तुर्तातूर्त मनाईचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

**४.** मी दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला. अर्जदार प्रतिवादी क्रमांक १ यांचेतर्फे अॅड.एम.डी.जाधव यांनी असा युक्तिवाद केला की, वादींना वाद मिळकती विकावयाच्या आहेत. व त्यामधून येणारे उत्पन्न स्वत: गिळंकृत करावयाचे आहे. आणि त्यामूळेच वादींनी हा खोटा दावा दाखल केलेला आहे. अशा परिस्थितीमध्ये दाव्याचा निकाल लागेपर्यंत वादींविरूध्द तुर्तातूर्त मनाईचा आदेश पारीत करणे आवश्यक आहे. अन्यथा वादी वाद मिळकती हस्तांतरीत करतील.

**५.** वादी पक्षातर्फे अॅड.किकले यांनी असा युक्तिवाद केला की,

वादींना वाद मिळकती विकावयाच्या नाहीत. वाद मिळकती वादींच्याच मालकीच्या आहेत. तरीदेखील प्रतिवादी वाद मिळकतीची वहिवाट करण्यापासून वादींना हरकत घेत आहेत. आणि त्यामूळे वादींनी हा निरंतर मनाईचा दावा दाखल केलेला आहे. अशा परिस्थितीमध्ये प्रतिवादींचे जर असे मत असेल, की वाद मिळकती वडीलोपार्जित मालकीच्या आहेत, तर प्रतिवादींनी त्याबाबतचा योग्य तो पुरावा न्यायालयासमोर दाखल करणे अत्यंत आवश्यक आहे. त्याबाबतचा कोणताही पुरावा प्रतिवादी पक्षाने न्यायालयासमोर दाखल केलेला नाही. आणि त्यामूळे प्रतिवादी तुर्तातूर्त मनाई मिळविण्यास पात्र नाहीत. त्याचप्रमाणे वादींतर्फे ॲड.किकले यांनी न्यायालयास अशी हमी दिली की, दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय लागेपर्यंत वाद मिळकतीची तबदीली वा हस्तांतरण न करण्यास वादी तयार आहेत. वादी वाद मिळकतीची तबदीली वा हस्तांतरण करणार नाहीत.

**६. माझ्या विचाराधिन आलेले मुद्दे त्यावरील निष्कर्षासह खालीलप्रमाणे आहेत :—**

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | प्रतिवादी यांना सकृत दर्शनी योग्य बचाव आहे काय? | अंशत: होकारार्थी |
| २ | सोयीचा समतोल प्रतिवादींच्या बाजूने आहे काय? | अंशत: होकारार्थी |
| ३ | तुर्तातूर्त मनाईचा आदेश पारीत न केल्यास प्रतिवादी यांचे अपरिमित नुकसान होईल काय? | अंशत: होकारार्थी |
| ४ | अंतिम आदेश काय? | अर्ज अंशत: मंजूर करण्यात येत आहे |

# कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ ते ४ बाबत :—**

७. दावा कलम १अ मध्ये एकूण मिळून ८ शेत मिळकती आहेत. पैकी अनुक्रमांक १ ते ३ शेत मिळकतींबाबत वादींनी निशाणी ३ सोबत एक खरेदीखताची झेरॉक्स प्रत दाखल केलेली आहे. मी त्याचे अवलोकन केले. त्यावरून सकृतदर्शनी असे दिसून येत आहे की, दावा कलम १अ मध्ये समाविष्ट अनुक्रमांक १ ते ३ या मिळकती वादी यांनी सन १९९१ साली खरेदी केलेल्या आहेत. निश्चितच त्यावेळी प्रतिवादी क्रमांक १ यांचे वय जास्तीत—जास्त ५ ते ६ वर्षे इतके होते. म्हणजे नक्कीच त्या मिळकती वादी यांच्या स्वकष्टार्जित आहेत, असे सकृतदर्शनी दिसून येत आहे.

८. प्रतिवादींनी असा जरूर बचाव मांडलेला आहे की, ''दावा कलम १अ मधील अनुक्रमांक १ ते ३ या मिळकती वादी व प्रतिवादी यांच्या एकत्र कुटूंबाच्या मालकीच्या आहेत. त्या मिळकती वादी यांनी एकत्र कुटूंबाचे कर्ता म्हणून खरेदी केलेल्या आहेत.'' तथापि, प्रतिवादींचे हे विधान शाबित करण्याकरीता कोणताही सकृतदर्शनी पुरावा प्रतिवादींनी दाव्यात दाखल केलेला नाही.

९. वादींचे कथन असे आहे की, दावा कलम १अ मधील अनुक्रमांक ४ ते ८ या मिळकती पाच मिळकती एकत्रिकरण योजनेअंतर्गत वादी यांना मालकी हक्काने बहाल करण्यात आलेल्या आहेत. त्या मिळकती वादी यांच्याच ताब्यात आहेत. वादींच्या या विधानास प्रतिवादींचा असा बचाव आहे की, सदरच्या मिळकती या प्रतिवादी व वादी तसेच प्रतिवादी क्रमांक १ यांचे इतर दोन भाऊ यांच्या एकत्र कुटूंबाच्या मालकीच्या व वडीलार्जित अशा

जमिनी आहेत. त्यावर वादी, प्रतिवादी क्रमांक १ व प्रतिवादी क्रमांक १ यांचे इतर दोन बंधू यांच्या सामाईक वहिवाटी आहेत.

**१०.** सदर दावा वादींनी निरंतर मनाई मिळविण्यासाठी दाखल केलेला आहे. अशा परिस्थितीमध्ये ही वादींची जबाबदारी आहे की, वाद मिळकती या त्यांच्या एकट्याच्या मालकीच्या व वहिवाटीच्या आहेत हे शाबित करणे. जमीन एकत्रिकरणावेळी त्यांना गट क्रमांक देऊन, त्या वादींना बहाल करण्यात आल्या व त्याबाबतचा फेरफार नोंदविण्यात आला, याचा अर्थ असा होणार नाही की, त्या सर्व जमिनी वादी यांच्या एकट्याच्याच मालकीच्या आहेत. अनुक्रमांक ४ ते ८ या मिळकतींवर वादी यांची एकट्याचीच मालकी व वहिवाट आहे, हे शाबित करण्याची संपूर्ण जबाबदारी वादींची आहे. त्याबाबत वादींनी योग्य असा कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. आणि त्यामूळे मला सकृतदर्शनी असे दिसून येत आहे की, सदर जमिनी म्हणजेच दावा कलम १अ मधील अनुक्रमांक ४ ते ८ या मिळकती वादी यांच्या एकट्याच्याच मालकीच्या व वहिवाटीच्या आहेत, हे सकृतदर्शनी शाबित करण्यास वादी अपयशी ठरलेले आहेत. अशा परिस्थितीमध्ये प्रतिवादींनी वादींविरूध्द दावा कलम १अ मधील अनुक्रमांक ४ ते ८ या मिळकतींबाबत मांडलेला बचाव सकृतदर्शनी योग्य वाटत आहे. तथापि, दावा कलम १अ मधील अनुक्रमांक १ ते ३ या मिळकतींबाबत प्रतिवादींनी मांडलेला बचाव सकृतदर्शनी शाबित होत नाही. आणि म्हणून मी असे निष्कर्षित करतो की, प्रतिवादी क्रमांक १ यांनी त्यांचा अंशत: बचाव सकृतदर्शनी शाबित केलेला आहे. आणि म्हणून मी मुद्दा क्रमांक १ला अंशत: होकारार्थी निष्कर्ष देत आहे.

**११.** निश्चितच वादींतर्फे ॲड.किकले यांनी न्यायालयामध्ये अशी तोंडी हमी दिलेली आहे की, दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय लागेपर्यंत वादी वाद

मिळकतीची तबदीली वा हस्तांतरण करणार नाहीत. दावा कलम १अ मधील नमूद अनुक्रमांक १ ते ३ या मिळकती वादी यांच्या स्वकष्टार्जित मालकीच्या आहेत, हे वादींनी सकृतदर्शनी शाबित केलेले आहे. तथापि, दावा कलम १अ मधील अनुक्रमांक ४ ते ८ या मिळकती वादी यांच्या एकट्याच्याच मालकीच्या व वहिवाटीच्या आहेत, हे सकृतदर्शनी शाबित करण्यास मात्र वादी अपयशी ठरलेले आहेत. अशा परिस्थितीत सदर अनुक्रमांक ४ ते ८ या मिळकतींबाबत सोयीचा समतोल वादींचे बाजूने नसून, प्रतिवादी क्रमांक १ यांचे बाजूने आहे. त्या मिळकती तबदील वा हस्तांतरीत होऊ नये म्हणून तुर्तातूर्त मनाई आदेश पारीत न केल्यास, प्रतिवादी क्रमांक १ यांचे अपरिमित नुकसान होईल. आणि म्हणून मी मुद्दा क्रमांक २ व ३ यांना अंशतः होकारार्थी निष्कर्ष देत आहे. व मुद्दा क्रमांक ४ चे निष्कर्षाप्रती मी खालील आदेश पारित करीत आहे.

## **आदेश**

**१.** अर्ज अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

**२.** दावा कलम १अ मधील अनुक्रमांक ४ ते ८ या मिळकतींचे, दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय लागेपर्यंत, हस्तांतरण वा तबदीली करू नये, असा तुर्तातूर्त मनाईचा आदेश वादी यांना देण्यात येत आहे.

सासवड **(अे.आर.दिंडे)**
दिनांक :— १६/०४/२०१८. सह.दिवाणी न्यायाधीश क.स्तर, सासवड

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word for word as per original Judgment.

Name of Steno : M. D. Shirode, Stenographer (L.G.)

Court Name : Shri. Amit R. Dinde
Civil Judge Jr. Division, Saswad.

Date of Judgment : 16/04/2018

Judgment signed by presiding officer on : 16/04/2018

Judgment uploaded on : 08/08/2018